FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

0154206

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( **Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. ४८, वर्ष Year २०१९, दिनांक Date ०१/१२/२०१९

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम १९८८
   (ii) अधिनियम Act —, कलमे Sections ७, ७अ
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections —, कलमे Sections —

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day सोमवार, तारीख पासून Date from २९/११/२०१९ वेळ Time ११.३०, तारीख पर्यंत Date to ३०/११/१९, वेळ Time १७.४५
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date २९/११/२०१९, वेळ Time ११.२०
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ......, तारीख Date ......, वेळ Time ......

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. उत्तर, अंदाजे ६ कि.मी., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ......
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name महात्मा फुले भवन मुंबई विद्यापीठ कलिना, मुंबई, ठिकाणाचे नंबर No. if any ......, गल्ली Ward ......, रस्त्याचे नाव Name of road ......
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ......, गाव Village ......, पोस्ट Post ......, तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ......, तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name कु. स्वराली संजय देवळेकर (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name संजय देवळेकर
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age २९ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ७३०४३८८७२०
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. —, दिल्याचा दिनांक Date of Issue ......, दिल्याचे ठिकाण Place of Issue ...... (f) व्यवसाय Occupation ......
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ......, जनजात Sub-Caste ......
   (h) पत्ता Address : ३०२, बी विंग, ३ रा मजला, राम निवास सोसायटी, गल्ली / सर्व्हे नं. Ward ......, घर / नाव नं. House/Name No. ......, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ......, पॅन नं. PAN No. ......, मेटर्स नं. Card No. ......
   रस्त्याचे नाव Road पनकी कॉलेज जवळ, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ......, खारकर गाव Village आळी, पोस्ट Post ......, पो. स्टे. P. Stn. ......
   ठाणे (प)
   तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ठाणे, राज्य State ......, सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
   पिकेश वसंतलाल शाह, ४८ वर्षे, धंदा-नोकरी (कनिष्ठ लिपीक), पद के सोमय्या कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स अॅन्ड कॉमर्स, विद्याविहार (पू), मुं-
   रा.रु. १५/११, गजानन कॉलनी, जवाहर नगर, गोरेगाव (प), मुं ६२

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

दाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........................................

easons for delay in reporting by the Complainant / Informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी रकाना नं ६ मध्ये नमुद फिर्यादी या यांचे सोमय्या डिग्री कॉलेज, विद्याविहार येथुन बी.एम.एस., सन २०२०-२१ मध्ये दिलेल्या परिक्षेचे मार्कशिट पुढील शिक्षणाकरीता त्यांचे त्यांना आवश्यकता असल्याने, ती मिळवून देण्याकरीता रकाना नं ७ मध्ये नमुद आलोसे यांनी फि. यांचेकडे स्वतःकरीता व [illegible] प्रवाशोद, कलीनाथ संबंधीत रुपये देण्याकरीता एकुण रु. ५,५००/- एवढ्या लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३,५००/- एवढ्या रकमेच्या लाचेची मागणी केली त्यापैकी रु २०००/- इतकी लाचेची रक्कम म्हणून फि. यांचे कडुन स्विकारली व दि. ३०/११/२०२१ रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान रु १५००/- रक्कम लाचेची रक्कम स्विकारताना आलोसे यांना रंगेहाथ पकडल्याने फि. यांनी आलोसे यांचेविरुद्ध कायदेशिर कारवाई करण्याबाबत केलेल्या तक्रारीवरुन गुन्हा नोंद करण्यात आला.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........................................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ................, जिल्हा ................, राज्य ................

**Action taken** : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................... (3) Transferred to P. S. ....................................

District.................................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ....................

पदनाम Rank ....................

तपासिक अं. चा कोड क्र. ....................

Posting

Code No. of I. O. ....................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

३/c

फिर्याद

दिनांक:— ३०/११/२०२१

कु. स्वराली संजय देवळेकर, वय २१ वर्षे, धंदा — शिक्षण, रा.ठि. — ३०२, बी विंग, तिसरा मजला, रामनिवास सोसायटी, एन.के.टी. कॉलेज जवळ, खारकर आळी, ठाणे पश्चिम, ठाणे ४०० ६०१, मो.क्र. ७३०४३८६७३०.

---

मी वर नमुद प्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर मागील दिढ वर्षापासून वास्तव्यास आहे. आमचे कुटूंबात मी, व माझी आई असे सदस्य आहेत. मी एस्.के. सोमय्या डिग्री कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स ॲण्ड कॉमर्स विद्याविहार पुर्व येथुन बॅचलर इन मास मिडीयाची (बी.एम्.एम्.) परिक्षा सन २०२०—२१ मध्ये दिली असून त्यात मी उतिर्ण झाली आहे. परंतू मला सदर कोर्सची फायनल मार्कशिट मला माझे कॉलेजकडून मिळाली नसल्याने व माझे पुढील शिक्षणाकरीता माझे नमुद डिग्रीच्या फायनल मार्कशिटची आवश्यकता असल्याने मी दिनांक १७/११/२०२१ रोजी माझे कॉलेजमध्ये गेले असता कॉलेजचे स्टाफ लोकसेवक श्री. पिंकेश वसंतलाल शाह सर यांनी माझेकडे मार्कशिट देण्याकरीता एकुण रू. ३,०००/— व त्यापैकी ॲडव्हांन्स म्हणुन रू. २,०००/— ची मागणी केली.

नमुद फायनल मार्कशिट मिळविण्याकरीता माझी पैसे देण्याची इच्छा नसताना देखील मी दिनांक १८/११/२०२१ रोजी ॲडव्हांन्स म्हणुन रू. २,०००/— लोकसेवक पिंकेश सर यांना दिले. त्यावेळी लोकसेवक पिंकेश सरांनी त्यातील पैसे मुंबई युनिर्व्हसिटी मधील संबधीत स्टाफला दयावे लागतात तिथूनच काम होईल असे सांगून उर्वरित रू. १,०००/— हे मार्कशिट देतेवेळी दयावे लागतील असे सांगीतले. त्यानंतर लोकसेवक श्री. पिंकेश सरांनी सांगीतले की, मुंबई युनिर्व्हसिटी, कलीना मधील त्यांचे ओळखीच्या स्टाफने अजुन पैसे वाढवून मागीतले असल्याने आता एकुण रू. ५,०००/— दयावे लागतील असे सांगून त्यांनी मला दिनांक २९/११/२०२१ रोजी मुंबई युनिर्व्हसिटी, कलीना येथे भेटण्याकरीता बोलाविले. परंतु मला लोकसेवक पिंकेश सरांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी सदर बाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई कार्यालयात दिनांक २९/११/२०२१ रोजी समक्ष हजर राहून लोकसेवक पिंकेश सर व मुंबई युनिर्व्हसिटी, कलीना मधील संबधीत स्टाफ यांच्या विरोधात कारवाई करण्याकरीता लेखी तक्रार दिली.

माझ्या लेखी तक्रारीवरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील सपोआ शितल घोगरे व पर्यवेक्षक अधिकारी सपोआ गणेश कुंभार यांनी दोन शासकीय पंचाना बोलावून लोकसेवक पिंकेश सर यांनी मुंबई युनिर्व्हसिटी, कलीना मधील संबधीत स्टाफ करीता माझ्याकडे लाच मागीतली आहे किंवा कसे? याबाबत दिनांक २९/११/२०२१ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली. सदर पडताळणी दरम्यान लोकसेवक पिंकेश सर हे मुंबई युनिर्व्हसिटी, कलीना येथील महात्मा ज्योतीराव फुले भवनच्या पहिल्या मजल्यावर उपस्थित असल्याचे व लोकसेवक पिंकेश सर यांनी मुंबई युनिर्व्हसिटी, कलीना येथुन तेथील संबधीत स्टाफला लाचेची रक्कम देऊन त्यांचेकडून मार्कशिट काढुन देण्याकरीता रू. ५,०००/— इतक्या रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रू. ३,५००/— इतक्या रक्कमेची लाचेची मागणी करून दिनांक ३०/११/२०२१ रोजी भेटण्यास बोलाविल्याचे स्पष्ट झाले.

दिनांक २९/११/२०२१ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने दिनांक ३०/११/२०२१ रोजी मला व पंचाना सपोआ शितल घोगरे व पर्यवेक्षक अधिकारी गणेश कुंभार यांनी पुढील सापळा कारवाईबाबत सविस्तर माहिती व सुचना दिल्या व त्यानंतर मी, पंच, सपोआ शितल घोगरे, पर्यवेक्षक अधिकारी गणेश कुंभार व सापळा पथक असे आम्ही सर्व शासकीय वाहनांनी लोकसेवक पिंकेश सर यांची भेट घेण्याकरीता जात असताना मुंबई युनिर्व्हसिटीच्या परिसरात आलो असता लोकसेवक पिंकेश सर यांचा त्यांचा मोबाईल क्र. ९८१९०३२१६१ यावरून माझा मोबाईल क्र. ७३०४३८६७३० यावर कॉल आला. सदर कॉलच्या

संभाषणात त्यांनी मला मुंबई युनिर्व्हसिटी, कलीना येथील महात्मा ज्योतीराव फुले भवनच्या पहिल्या मजल्यावर येण्यास सांगीतले. त्यानंतर सपोआ शितल घोगरे यांनी दिलेल्या सुचनांचे अनुषंगाने, त्यांनी चालु करून दिलेला व्हॉईस रेकॉर्डर मपोना अरूणा सुर्यवंशी यांचे मदतीने माझे ड्रेसला लावला. तद्नंतर मी महात्मा ज्योतीराव फुले भवन येथील पहिल्या माळयावर लोकसेवक पिंकेश सरांची भेट घेण्याकरीता निघाले. सपोआ शितल घोगरे यांच्या सुचनांप्रमाणे माझे मागोमाग पंच क्र. ०१ श्री. ठाकरे हे महात्मा ज्योतीराव फुले भवनच्या पहिल्या माळयावर येण्याकरीता निघाले. महात्मा ज्योतीराव फुले भवनच्या मुख्य प्रवेशव्दाराने मला भवनमध्ये जाण्यासाठी प्रवेश मिळाला, परंतु पंच क्र. ०१ श्री. ठाकरे यांना प्रवेश नाकारण्यात आल्याने ते महात्मा ज्योतीराव फुले भवनच्या बाहेरच थांबले. मी महात्मा ज्योतीराव फुले भवनच्या पहिलया माळयावर जावून लोकसेवक पिंकेश सरांची भेट घेतली असता ते मला सोबत घेऊन महात्मा ज्योतीराव फुले भवनच्या इमारतीतील कार्यालय २४ ए, ३४ बी व पहिल्या मजल्याच्या पोटमजल्यावरील मध्यवर्ती संगणीकृत कक्ष (सी.सी.एफ) या कार्यालयात मला आवश्यक असलेल्या मार्कशिटची प्रिंट घेण्याकरीता घेऊन गेले. त्यानंतर लोकसेवक पिंकेश सरांनी मला आवश्यक असलेले माझे बॅचलर इन मास मिडीयाची (बी.एम्.एम्.) सन २०२०—२१ च्या परिक्षेची मार्कशिट मिळवून दिली.

त्यानंतर मी लोकसेवक पिंकेश सर यांच्यासोबत महात्मा ज्योतीराव फुले भवनच्या इमारतीबाहेर आले व रस्त्याने पुढे चालत जात असताना रस्त्यात लोकसेवक पिंकेश सरांनी माझेकडून लाचेची रक्कम रू. १,५००/— स्विकारल्याने लागलीच मी लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारल्याबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला असता सभोवताली असलेल्या सापळा पथकातील अंमलदारांनी लोकसेवक पिंकेश सर यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले आहे. तद्नंतर सापळा कारवाईतील पुढील कार्यवाही करण्याकामी लोकसेवक पिंकेश सर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई कार्यालयात आणण्यात आले.

एकंदरीत मी एस्.के. सोमय्या डिग्री कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स ॲण्ड कॉमर्स विद्याविहार पुर्व येथुन बॅचलर इन मास मिडीयाच्या (बी.एम्.एम्.) सन २०२०—२१ मध्ये दिलेल्या परिक्षेत उर्त्तीण झाली, परंतु मला सदर कोर्सची फायनल मार्कशिट माझे कॉलेजकडून न मिळाल्याने व माझे पुढील शिक्षणाकरीता नमुद डिग्रीच्या फायनल मार्कशिटची मला आवश्यकता असल्याने, ती मिळवून देण्याकरीता कॉलेजचे स्टाफ लोकसेवक श्री. पिंकेश वसंतलाल शाह सर यांनी माझेकडे स्वत:करीता व मुंबई विदयापीठ, कलीना येथील संबधीत स्टाफला देण्यासाठी म्हणून एकुण रू. ५,०००/— येवढया लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. ३,५००/— येवढया रक्कमेची लाचेची मागणी केली व त्यापैकी रू. २,०००/— इतकी लाचेची रक्कम ॲडव्हांन्स म्हणुन माझेकडून स्विकारली व दि. ३०/११/२०२१ रोजीच्या सापळा कारवाईदरम्यान उर्वरीत रू. १,५००/— इतकी लाचेची रक्कम स्विकारली असता, सापळा पथकाने लोकसेवक पिंकेश सर यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले आहे. तरी लोकसेवक पिंकेश वसंतलाल शाह, कनिष्ठ लिपिक, एस.के. सोमय्या डिग्री कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स ॲण्ड कॉमर्स व मुंबई विदयापीठ, कलीना येथील संबंधीत स्टाफ यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी माझी तक्रार आहे.

समक्ष,

( शितल घोगरे )
सहायक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

स्वराली देवळेकर